Epaper

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

। शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १५४ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

उदय सामंतांचा धुळ्यात शिवसेना पदाधिकाऱ्यांना घरचा आहेर!

(पान २ वर)



Selected

राज्यात पावसाची शक्यता

मुंबई : ऑगस्ट महिन्यापासून राज्यात सर्वदूर पावसाचा अभाव असून त्यामुळे बहुतांश जिल्ह्यांत पावसाची मोठी तूट निर्माण झाली आहे. सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात काही भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला असला तरी बहुतांश भाग कोरडे होते. पुढील दोन दिवसांत हवामान प्रणालीच्या सक्रियतेमुळे हवामान विभागाने राज्यात सर्वदूर पावसाची शक्यता वर्तवली असून काही भागात मुसळधार पावसाची, तर काही भागात वादळी पावसाची शक्यता आहे. त्यामुळे शनिवारी आणि रविवारी राज्यातील बहुतांश भागात मागील काही दिवसांच्या तुलनेत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. यंदा राज्यात पावसाचे प्रमाण असमान आहे. त्यामुळे अनेक भागात पावसाची तूट कायम असून त्याचा थेट परिणाम शेतीवर होत असल्याने शेतकरी संकटात आहेत. मोसमी पावसाचा हंगाम अंतिम टप्यात आहे.

मनोज जरांगेंच्या आंदोलनावर गिरीश महाजनांचा सवाल; सनदशीर मार्गानेच तोडगा निघेल”

मर्यादा असली पाहिजे; त्या मागण्या कशा मान्य करायच्या?

जन सम्राट टाईम्स

मुंबई/जालना। मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी येथे सुरू असलेले उपोषण चौदाव्या दिवशीही कायम आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील यांनी आता मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा दिल्याने राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री गिरीश महाजन यांनी जरांगे पाटील यांच्या भूमिकेवर स्पष्ट प्रतिक्रिया देत, मागण्यांनाही काही मर्यादा असायला हव्यात, असे मत व्यक्त केले.

मनोज जरांगेंच्या आंदोलनावर गिरीश महाजन यांची स्पष्टोक्ती

गिरीश महाजन म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या काळात सरकारकडून वेळोवेळी शिष्टमंडळे त्यांची भेट घेण्यासाठी गेली आहेत. त्यांच्या मागण्या ऐकून घेण्यात आल्या असून, १४ मागण्यांपैकी १२ मागण्या मान्य करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. “प्रत्येक वेळी उपोषणाला बसल्यानंतर सरकारने त्यांच्याशी संवाद साधला आणि त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. मात्र, जात पडताळणी समितीच रद्द करून टाका, अशा स्वरूपाच्या ज्या मागण्या सनदशीर नाहीत, त्या कशा मान्य करायच्या?” असा सवाल महाजन यांनी उपस्थित केला.

जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पद्धतीवरही महाजन यांनी नाराजी



व्यक्त केली. प्रत्येक वेळी वेगळी मागणी पुढे करणे आणि एका मुद्द्यावर अडून बसणे योग्य नसल्याचे ते म्हणाले. “मागण्यांसंदर्भातही कुठेतरी मर्यादा असली पाहिजे. कुठेतरी एकाच ठिकाणी अडून बसायचे, मला तरी हे योग्य वाटत नाही,” असे महाजन यांनी स्पष्ट केले. तसेच मंत्री आणि मुख्यमंत्र्यांबाबत वापरल्या जाणाऱ्या भाषेवरही त्यांनी आक्षेप घेतला. उच्च पदावर असलेल्या व्यक्तींविषयी अशा प्रकारची भाषा वापरून प्रश्न सुटणार नाहीत. त्यामुळे जरांगे पाटील यांनीही कुठेतरी थांबले पाहिजे आणि सनदशीर मार्गानेच या प्रश्नावर तोडगा काढला पाहिजे, असे महाजन म्हणाले. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन मुंबईत नेण्याचा इशारा दिला आहे. त्यांच्या या भूमिकेच्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. परवानगीशिवाय मुंबईत आंदोलन करता येणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केल्याचा दावा महाजन यांनी केला. तसेच जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची तपासणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबईत आंदोलन करण्याच्या इशाऱ्यावर बोलताना महाजन यांनी कायदेशीर आणि सनदशीर मार्गाचा अवलंब करण्याचे आवाहन केले.मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा कालावधी आता चौदा दिवसांवर पोहोचला आहे. त्यामुळे त्यांच्या आरोग्याबाबतही महाजन यांनी चिंता व्यक्त केली. “उपोषणाचा प्रकृतीवर परिणाम होतो. त्यामुळे त्यांनी आता आपल्या तब्येतीची काळजी घेतली पाहिजे,” असे गिरीश महाजन यांनी म्हटले. दरम्यान, मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर जरांगे पाटील यांची आक्रमक भूमिका आणि सरकारची भूमिका यामुळे आंदोलनाच्या पुढील टप्प्याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. मुंबई आंदोलनाबाबत पुढील भूमिका काय असेल आणि सरकारकडून त्यावर कोणती पावले उचलली जातील.

जरांगे यांच्या भाषेवर भुजबळांचा निशाणा

नाशिक : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांच्या आक्रमक भूमिकेवर अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल या सरकारच्या वतीने जरांगे यांच्याशी चर्चा करण्यासाठी गेल्या होत्या. मात्र, त्यांच्याशी व्यवस्थित चर्चा न झाल्याने त्या निराश झाल्याचे भुजबळ यांनी सांगितले. “जरांगे सध्या कुणालाच सोडत नाहीत.

गणेशोत्सवासाठी निघालेल्या हजारो वाहनांचा भार रस्त्यावर, मुंबई-गोवा महामार्गावर खोळंबा

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: गणेशोत्सवानिमित्त मुंबई, ठाण्यातून कोकणात जाणाऱ्या नागरिकांसाठी सोडण्यात आलेल्या मोफत एसटी बसगाड्या आणि गणेशोत्सवाच्या खरेदीसाठी घराबाहेर पडलेल्या नागरिकांच्या वाहनांमुळे शुक्रवारी रात्री ठाणे आणि नवी मुंबईतील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. पनवेलमधील पळस्पे पुलावर अवजड वाहनांच्या रांगा लागल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला. मुंबई-गोवा महामार्गावरही कोंडी झाल्याने त्याचा फटका प्रवाशांना बसला. ठाण्यातील पूर्व द्रुतगती महामार्ग, मुंब्रा बाह्यवळण मार्ग, शिळफाटा-महापे मार्ग, ठाणे-बेलापूर मार्ग, खारघर येथे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली. कामानिमित्ताने बाहेर पडलेल्या नागरिकांना या कोंडीचा मोठा फटका बसला. ठाणे रेल्वे स्थानक परिसरातही प्रवाशांचे हाल झाले. टीएमटीच्या बसगाड्या तसेच रिक्षा सहज उपलब्ध होत नसल्याने स्थानकातील सॅटीस पुलावर प्रवाशांच्या रांगा लागल्या होत्या. बसगाड्यांसाठी प्रवाशांना तब्बल २० ते २५ मिनिटे प्रतीक्षा करावी लागत होती. त्यामुळे रेल्वे स्थानकातून बाहेर पडलेल्या प्रवाशांना इच्छितस्थळी जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. कोकणात जाणाऱ्या नागरिकांसाठी विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी समूह पद्धतीने एसटीची नोंदणी केली आहे. या एसटी बसगाड्या शुक्रवारी कोकणाच्या दिशेने रवाना करण्यात आल्या. तसेच, अनेकजण त्यांच्या खासगी वाहनानेही रायगड, रत्नागिरीच्या दिशेने निघाले. त्याचा परिणाम वाहतूक व्यवस्थेला बसला. ठाणे ते वाशी हे अर्धा ते पाऊण तासाचे अंतर पार



करण्यास वाहनचालकांना किमान दोन तास लागले.दरम्यान, ठाणे बाजारपेठेतही गणेशोत्सवाच्या खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. त्यामुळे शहरातील अनेक मार्गांवर वाहतूक कोंडी होऊन टीएमटीच्या बसगाड्याही त्यात अडकल्या. त्याचा परिणाम ठाणे रेल्वे स्थानकातील सॅटीस पुलावर झाला. बसगाड्यांसाठी प्रवाशांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मुंबई : कोकणात जाणाऱ्या नोकरदारांच्या संख्येत वाढ झाली आहे. मुंबई महानगरातून शुक्रवारी रात्री कोकणाच्या दिशेने ३ हजार एसटी आणि ३,२०० खासगी बस रवाना झाल्या. यंदा खासगी बसच्या संख्येत १५ टक्यांनी वाढ झाली आहे. एसटी महामंडळाने घोषित केलेल्या ५,७४३ जादा गाड्याही पूर्ण क्षमतेने फुल्ल झाल्या आहेत. यात सर्वाधिक गाड्या समूह आरक्षणाच्या आहेत. शुक्रवारी ३,०२८ एसटी कोकणात रवाना झाल्या.मुंबई-गोवा महामार्गावर शुक्रवारी सकाळी वाहनांची संख्या वाढल्याने माणगाव आणि इंदापूर परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पाच ते सहा किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी पाऊण ते एक तास लागत होता. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अवजड वाहनांना बंदी असतानाही काही ट्रक आणि रसायनांचे टँकर रस्त्यावर दिसून आले. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या अधिक गंभीर झाली. गणेशोत्सवानिमित्त मुंबई, ठाण्यातून कोकणात जाणाऱ्या नागरिकांसाठी सोडण्यात आलेल्या मोफत एसटी बसगाड्या आणि गणेशोत्सवाच्या खरेदीसाठी घराबाहेर पडलेल्या नागरिकांच्या वाहनांमुळे शुक्रवारी रात्री ठाणे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. पनवेलमधील पळस्पे पुलावर अवजड वाहनांच्या रांगा लागल्यानेझाला. मुंबई-गोवा महामार्गावरही कोंडी झाल्याने त्याचा फटका प्रवाशांना बसला. ठाण्यातील पूर्व द्रुतगती महामार्ग, मुंब्रा बाह्यवळण मार्ग, शिळफाटा-महापे मार्ग, ठाणे-बेलापूर मार्ग, खारघर येथे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली.

विधानभवन, मंत्रालयाचे ज्योतिष मार्गदर्शन केंद्र बनू देऊ नका!

जन सम्राट टाईम्स

मुंबई |प्रतिनिधी: भारतीय ज्ञानाच्या नावाखाली ‘कालायन’ यंत्रात खगोल विज्ञान आणि ज्योतिष या दोन परस्परविरोधी गोष्टींची सरमिसळ केली गेली असून हे यंत्र बसवून मंत्रालय आणि विधीमंडळाचे ज्योतिष मार्गदर्शन केंद्र बनू देऊ नका, अशी टीका महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अंनिस) केली आहे. तसेच, हे यंत्र बसविण्याचा निर्णय तातडीने रद्द करण्याची मागणी केली आहे. राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागाने मंत्रालय परिसर आणि विधानभवन येथे ‘कालायन’ उपकरण बसविण्याकरिता १० लाख ९७ हजार ४०० रुपयांचा खर्च मंजूर केला आहे. सरकारनेच दिलेल्या माहितीनुसार कालायन हे केवळ वेळ दाखवणारे घड्याळ नसून यात राशी, नक्षत्रे, पंचांग अशा सर्व गोष्टींची प्रमाण वेळेशी सरमिसळ आहे. मात्र, ‘यामधून कुठलाही वैज्ञानिक आधार नसलेले ज्योतिष आणि खगोल विज्ञान हे एकच असल्याचा भास निर्माण केला जात आहे. ग्रहांची स्थिती, त्यांची गती, सूर्योदय-सूर्यास्त यांची अचूक गणना करणे हा खगोलशास्त्राचा विषय आहे. मात्र ग्रह-नक्षत्रांच्या स्थितीचा आधार घेऊन एखाद्या व्यक्तीचे भविष्य, व्यक्तिमत्त्व, भाग्य किंवा जीवनातील घटना सांगता येतात, हा ज्योतिषाचा दावा वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेला नाही. त्यामुळे खगोलशास्त्रीय माहिती आणि ज्योतिषीय विश्वास यांना एकाच ‘विज्ञानाधारित’ चौकटीत मांडणे दिशाभूल करणारे आहे,’ अशा शब्दांत समितीचे डॉ. हमीद दाभोलकर, राहुल थोरात, प्रवीण देशमुख ,नंदिनी जाधव, रामभाऊ डोंगरे, श्रीपाल लालवाणी यांनी आक्षेप नोंदवला आहे.

चार कोटी रुपयांचे संशयास्पद बटर अहिल्यानगरमध्ये जप्त

जन सम्राट टाईम्स

अहिल्यानगर । प्रतिनिधी: कमी दर्जाचे असल्याच्या संशयावरून तसेच लेबल वर्णनाच्या उल्लंघनावरून येथील अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांच्या पथकाने नगरच्या एमआयडीसी मधील शीतगृहात ठेवलेले ३ कोटी ९५ लाख ६२ हजार ३२० रुपये किंमतीचे ७५ हजार ३५६ किलो वजनाचे बटर (पाश्चराईड कुकिंग बटर-अनसोल्टेदड) धाड टाकून जप्त करण्यात आले. अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त गौरव जगताप (अन्न) यांनी या कारवाईची माहिती दिली. जप्त करण्यात आलेले बटर हा अन्न पदार्थाचा साठा पतंजली फूड्स लिमिटेड कंपनीचा असल्याचा अन्न व औषध प्रशासन विभागाचा प्राथमिक अंदाज आहे. त्याबाबत पुढील तपास सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. हे संशयास्पद बटर पाटस (ता. दौंड) येथील मधुरमा क्रिमी डिलाईट या कंपनीने उत्पादित करून नगरच्या एमआयडीसीमधील ‘अरिहंत कोल्ड स्टोरेज’मध्ये ठेवलेले होते. हे बटर कमी दर्जाचे व लेबल वर्णनाच्या उल्लंघनावरून (मुदत संपण्याची तारीख नाही) जप्त करण्यात आले आहे. जप्त साठ्यातून घेतलेले नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. त्याचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे. विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे सहाय्यक आयुक्त जगताप यांनी



सांगितले. या कारवाईमध्ये अन्नसुरक्षा अधिकारी राजेश बडे, पी. पी. पवार, किरण जगदाळे, प्रसाद कसबेकर यांच्या पथकाने सहभाग घेतला. काल, गुरुवारी रात्री ८ च्या सुमारास सुरू झालेली कारवाई आज, शुक्रवारी सकाळी संपली.अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशाने व सहआयुक्त एम. यु. माने (नाशिक) यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. आगामी काळ सणासुदीचा असल्यामुळे अहिल्यानगर शहरातील मिठाई व खाद्यपदार्थ विक्रीच्या व्यावसायिकांनी कोणतेही कमी दर्जाचे अन्नपदार्थ व अस्वच्छ ठिकाणी तयार करण्यात आलेल्या अन्नपदार्थांची विक्री, साठा करू नये. बाहेरील राज्यातून कमी दर्जाचे अन्नपदार्थ ट्रॅव्हल्स व इतर वाहनातून अस्वच्छ ठिकाणी ठेवू व मागवू नयेत. तसे आढळून आल्यास संबंधित ट्रॅव्हल्स एजन्सीवरही कारवाई करण्यात येईल, असा इशाराही सहाय्यक आयुक्त जगताप यांनी दिला आहे. सुमारे ४ कोटींचे बटर जप्त करण्यात आल्याने अन्नसुरक्षा विभागानेही केलेली कारवाई आजपर्यंतची सर्वात मोठी ठरण्याची शक्यता आहे. ऐन सणासुदीच्या तोंडावर ही कारवाई झाल्याने मिठाई उत्पादकांमध्ये खळबळ निर्माण झाली आहे. उत्पादक कंपनी नगरच्या शीतगृहात बटर ठेवून तिथून महाराष्ट्रभर वितरण करत असल्याचाही अन्नसुरक्षा विभागाला संशय आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

गणेशोत्सवात मद्यपींचा घसा कोरडा! पुण्यात दारुबंदीचा निर्णय

गणेश चतुर्थी आणि अनंत चतुर्दशीला संपूर्ण शहरात ‘ड्राय डे’; सलग १२ दिवस मद्यविक्री बंद

जन सम्राट टाईम्स

पुणे| प्रतिनिधी: लाडक्या गणरायाच्या आगमनाने पुणे शहरात गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. ढोल-ताशांचा गजर, आकर्षक रोषणाई, गणेश मंडळांची लगबग आणि बाजारपेठांमधील गर्दीने शहर भक्तिमय झाले आहे. दहा दिवसांचा गणेशोत्सव शांततेत, शिस्तीत आणि निर्विघ्नपणे पार पडावा, यासाठी पुणे शहर पोलीस आणि जिल्हा प्रशासनाने कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून उत्सव काळात मद्यविक्रीवर कठोर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. प्रशासनाच्या निर्णयानुसार काही विशिष्ट दिवशी संपूर्ण पुणे शहर व उपनगरांमध्ये मद्यविक्री बंद राहणार असून, मध्यवर्ती पेठ परिसरातील संवेदनशील भागात तब्बल १२ दिवस मद्यविक्रीवर निर्बंध असणार आहेत. त्यामुळे गणेशोत्सव काळात मद्यपींचा ‘घसा कोरडा’ राहणार आहे. १४ सप्टेंबरला संपूर्ण पुण्यात दारूबंदी गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी, सोमवार, १४ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थीच्या दिवशी संपूर्ण पुणे शहर आणि उपनगरांमध्ये सर्व प्रकारची मद्यविक्री बंद ठेवण्यात येणार आहे. या दिवशी मद्यविक्री करणाऱ्या आस्थापनांना प्रशासनाच्या आदेशाचे पालन करावे लागणार आहे. यानंतर उत्सवाच्या पाचव्या आणि सातव्या दिवशी घरगुती



तसेच लहान गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुका ज्या प्रमुख मार्गांवरून जाणार आहेत, त्या मार्गांवरील तसेच लगतच्या परिसरातील दारू दुकाने, बिअर बार आणि परमिट रूम बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. २५ सप्टेंबरला संपूर्ण शहर ‘ड्राय डे’ गणेशोत्सवाचा सांगता सोहळा असलेल्या अनंत चतुर्दशीला, शुक्रवार २५ सप्टेंबर रोजी संपूर्ण पुणे शहरात कडक ‘ड्राय डे’ पाळण्यात येणार आहे. या दिवशी सर्व प्रकारच्या मद्यविक्रीवर पूर्णपणे निर्बंध असतील. विशेष म्हणजे, पुण्यातील मानाचे आणि प्रमुख गणपतींच्या विसर्जन मिरवणुका २५ सप्टेंबरनंतरही सुरू राहण्याची शक्यता असल्याने शनिवार, २६ सप्टेंबर रोजी मिरवणुका पूर्णपणे संपेपर्यंत संबंधित विसर्जन मार्गांवरील मद्यविक्री बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मध्यवर्ती पेठांमध्ये सलग १२ दिवस बंदी गणेशोत्सवाच्या काळात शहराच्या मध्यवर्ती भागावर प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. मानाचे पाच गणपती, प्रमुख विसर्जन मार्ग आणि मोठ्या गणेश मंडळांमुळे या भागात मोठ्या प्रमाणात गर्दी होते. खडक, विश्रामबाग आणि फरासखाना या संवेदनशील पोलीस ठाण्यांच्या हद्दीत १४ सप्टेंबरपासून २५ सप्टेंबरपर्यंत सलग १२ दिवस मद्यविक्रीवर पूर्ण निर्बंध राहणार आहेत. त्यानंतर २६ सप्टेंबरला विसर्जन मिरवणुका पूर्णपणे संपेपर्यंत संबंधित परिसरातील दारू दुकाने व परमिट रूम बंद ठेवावी लागणार आहेत. उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा गणेशोत्सवात मद्यपानामुळे होणारे वाद, छेडछाड, भांडणे आणि मिरवणुकांदरम्यान निर्माण होणारा तणाव टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित पोलीस ठाण्यांमार्फत बारमालक आणि मद्यविक्री करणाऱ्या दुकानदारांना आवश्यक त्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. प्रशासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास गुन्हा दाखल करण्यासह परवान्याबाबत कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडण्यासाठी पुणेकरांनी प्रशासनाला सहकार्य करावे.

...विराट कोहलीने माझी भेट घेतली : उपमुख्यमंत्री शिंदे

जन सम्राट टाईम्स

कल्याण | प्रतिनिधी: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सध्या लंडनमध्ये आहेत. ब्रिटिश संसदेतील दोन स्वतंत्र कार्यक्रमांमध्ये त्यांना तीन पुरस्कार देण्यात आले. ‘हाऊस ऑफ लॉर्ड्स’मध्ये ‘कॉमनवेल्थ पब्लिक लीडरशिप रिकग्निशन’, तर ‘हाऊस ऑफ कॉमन्स’मध्ये ‘स्टेटसमनशिप अवॉर्ड’ने त्यांना गौरविण्यात आले. याशिवाय लंडनमधील महाराष्ट्र मंडळातर्फे त्यांना ‘ग्लोबल प्राइड ऑफ महाराष्ट्र’ हा सन्मान दिला गेला. भारताचा स्टार क्रिकेटपटू विराट कोहलीही लंडनमध्ये वास्तव्यास आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विराट कोहलीची भेट घेतली. या भेटीनंतर एएनआय वृत्तसंस्थेशी संवाद साधत असताना एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यात काय संवाद झाला, याची माहिती दिली. ते म्हणाले, “मी लंडनमध्ये आलो असल्याचे विराट कोहलीला कळल्यानंतर तो मला भेटण्यासाठी आला. भारताचा एवढा मोठा क्रिकेटपटूबरोबर भेटता आले, याचा मला आनंद वाटला. विराट खूप नम्र आहे. आम्ही यापूर्वीही अनेकदा भेटलो होतो. पण आजची भेट विशेष होती. आमच्यात अनेक विषयांवर चर्चा झाली.” उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, “मला जे पुरस्कार मिळाले आहेत. त्याबद्दल चर्चा झाली. याशिवाय महाराष्ट्रात आम्ही जी विकासकामे करत आहोत. त्याचीही माहिती दिली. विराट कोहलीनेही महाराष्ट्राच्या विकासाबद्दल बोलताना म्हटले की, यापूर्वी असा विकास पाहिला नव्हता. आम्ही पुढे काय काय करणार आहोत, याची माहिती दिली. आम्ही तिसरी मुंबई आता वसवत आहोत. अटल सेतू, बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग, शाळा आणि आरोग्याच्या बाबतीत आम्ही काय काम करत आहोत, याची चर्चा केली.”

काष्ट्राईब महासंघाने साथ दिल्यास आदिवासी विकास विभागात क्रांतिकारी बदल घडविणार : प्रा. अशोक उईके

आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह २८ मागण्यांवर सविस्तर चर्चा

जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी : आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सर्पदंश, अन्नातून विषबाधा तसेच अन्य कारणांमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या घटनांमुळे संपूर्ण आदिवासी विकास विभागाची बदनामी होत आहे. विद्यार्थ्यांचे जीवित आणि आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी धोरणात्मक पातळीवर ठोस बदल करण्याची गरज आहे. काष्ट्राईब महासंघाने सहकार्य केल्यास आदिवासी विकास विभागात क्रांतिकारी बदल घडवून आणू, अशी ग्वाही आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक उईके यांनी दिली. अरुण गाडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच सुशील तायडे यांच्या नेतृत्वाखाली काष्ट्राईब महासंघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मंत्री उईके यांनी संघटनेच्या मागण्या समजून घेत विभागाच्या कामकाजात आवश्यक त्या सुधारणा करण्याचे आश्वासन दिले. आदिवासी विकास विभागाची स्थापना १९८३ मध्ये झाली. मात्र आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे जीवित आणि आरोग्य याबाबत आवश्यक धोरणात्मक तरतुदी प्रभावीपणे लागू न झाल्याने आजच्या समस्या निर्माण झाल्याचे मंत्री उईके यांनी बैठकीत नमूद केले. २८ मागण्यांवर सविस्तर चर्चा काष्ट्राईब महासंघाच्या वतीने बैठकीत एकूण २८ मागण्या मांडण्यात आल्या. त्यामध्ये ६,८०० मृत घोषित पदे



पुनर्जीवित करणे आणि ही पदभरती बाह्यस्रोताद्वारे न करता सरळसेवेने करणे, गृहपाल व मुख्याध्यापकांना राजपत्रित दर्जा देणे, वसतिगृह आणि आश्रमशाळा प्रशासन स्वतंत्र करणे तसेच गृहपालांना वित्तीय व आकस्मिक परिस्थितीत निर्णय घेण्याचे अधिकार देणे, या प्रमुख मागण्यांचा समावेश होता. तसेच राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाच्या (NCPCR) वसतिगृह नियमांची काटेकोर अंमलबजावणी, सर्व विनाअनुदानित आश्रमशाळा शासनाच्या ताब्यात घेणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि जीविताच्या संरक्षणासाठी वित्त, आरोग्य, महिला व बालकल्याण, सामान्य प्रशासन आणि शिक्षण विभागाच्या अपर मुख्य सचिवांची उच्चस्तरीय समिती स्थापन करणे, या समितीत काष्ट्राईब महासंघाच्या दोन प्रतिनिधींचा समावेश करणे, अशा मागण्याही मांडण्यात आल्या. काष्ट्राईब महासंघाला आयुक्त व अपर आयुक्त कार्यालयात स्वतंत्र कार्यालय उपलब्ध करून देणे, चुकीच्या पद्धतीने निलंबित किंवा बडतर्फ करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना पुनःपदस्थापना देणे, अनुदानित आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांना १०, २० व ३० वर्षांच्या वेतनश्रेणीचा लाभ देणे तसेच काष्ट्राईब हाऊसिंग सोसायटीसाठी शासकीय भूखंड उपलब्ध करून देणे, या मागण्यांवरही बैठकीत चर्चा झाली. 'एकाच वेळी सर्व मागण्या पूर्ण होणार नाहीत; शासनाला सहकार्य करा' महासंघाने मांडलेल्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून त्या टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे मंत्री प्रा. अशोक उईके यांनी स्पष्ट केले. "सर्व मागण्या एका वेळेस पूर्ण होणार नाहीत. आपण सहकार्य करा आणि शासनाला साथ द्या," असे आवाहन त्यांनी काष्ट्राईब महासंघाच्या पदाधिकाऱ्यांना केले. आदिवासी समाजातील विद्यार्थी, पालक आणि कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे सांगताना मंत्री उईके यांनी, आपण स्वतः आदिवासी असल्याने या विभागात सकारात्मक आणि मूलभूत बदल घडवून आणण्याचा आपला प्रयत्न असल्याचेही स्पष्ट केले. बैठकीस अधिकारी व महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते. शासनाच्या वतीने रवींद्र जाधव (उपसचिव), दिनकर पवार (अपर आयुक्त, नाशिक) आणि दिगंबर चव्हाण (अपर आयुक्त, मुख्यालय, नाशिक) प्रत्यक्ष उपस्थित होते. तसेच इतर अपर आयुक्त आणि प्रकल्प अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीत सहभागी झाले. काष्ट्राईब महासंघाच्या वतीने विभागीय अध्यक्ष विनोद बनसोड, महिला संघटना अध्यक्ष सुवर्णा इंगोले, दीपली राऊत, पूनम साबळे, जितेंद्र चौधरी, समीर साळवी, धीरज पाटील, सचिन गडे, राजरत्न पवार यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सर्पदंश, अन्नातून विषबाधा तसेच अन्य कारणांमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या घटनांमुळे संपूर्ण आदिवासी विकास विभागाची बदनामी होत आहे. विद्यार्थ्यांचे जीवित आणि आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी धोरणात्मक पातळीवर ठोस बदल करण्याची गरज आहे. काष्ट्राईब महासंघाने सहकार्य केल्यास आदिवासी विकास विभागात क्रांतिकारी बदल घडवून आणू, अशी ग्वाही आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक उईके यांनी दिली. अरुण गाडे यांच्या अध्यक्षतेखाली काष्ट्राईब महासंघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मंत्री उईके यांनी संघटनेच्या मागण्या समजून घेत विभागाच्या कामकाजात आवश्यक त्या सुधारणा करण्याचे आश्वासन दिले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

प्रतिष्ठित नेतृत्व वाल्मीक गोकुळ पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा!



जन सम्राट टाईम्स

बाभळे / धरणगाव| प्रतिनिधी : बाभळे गावातील सामाजिक, राजकीय आणि कृषी क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे तसेच प्रगतशील शेतकरी म्हणून ओळख असलेले श्री. वाल्मीक गोकुळ पाटील यांचा वाढदिवस गुरुवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिजाऊ मित्र परिवारासह असंख्य ग्रामस्थांनी त्यांना शुभेच्छा देत पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. श्री. वाल्मीक पाटील हे बाभळे गावातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व असून गेल्या अनेक वर्षांपासून ते सामाजिक, शेतकरी आणि राजकीय क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत. त्यांनी राजकीय स्तरावर विविध पदांची जबाबदारी सांभाळली असून ग्रामीण विकास, शेती आणि सहकार क्षेत्रातील त्यांच्या योगदानामुळे युवकांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत त्यांचा मोठा जनसंपर्क निर्माण झाला आहे. सध्या बाभळे गावच्या भावी सरपंचपदासाठी प्रमुख दावेदार म्हणून त्यांच्या नावाची चर्चा सुरू असून, त्यांच्या नेतृत्वाखाली गावाचा सर्वांगीण विकास अधिक वेगाने होईल, असा विश्वास ग्रामस्थांकडून व्यक्त केला जात आहे. प्रगतशील शेतकरी म्हणून विशेष सन्मान गेल्या महिन्यात छत्रपती संभाजीनगर येथे बुस्टर प्लॅन्ट जेनेटिक्स प्रा. लि. यांच्या वतीने आयोजित 'बुस्टर प्रगतशील शेतकरी सन्मान सोहळा – २०२६' मध्ये श्री. वाल्मीक पाटील यांचा प्रगतशील शेतकरी म्हणून सन्मान करण्यात आला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्याच्या पद्धती आणि शेतीतील नाविन्यपूर्ण प्रयोग यामुळे त्यांच्या कृषी कार्याची दखल घेण्यात आली. कपाशी व मका पिकांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांनी उल्लेखनीय उत्पादन घेतले असून, परिसरातील शेतकऱ्यांनाही ते शेतीविषयक मार्गदर्शन करतात. गावविकासासाठी सातत्याने पुढाकार शेतीसोबतच गावातील शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रम, रस्ते, दिवाबत्ती, ग्रामस्वच्छता आणि इतर विकासकामांसाठी त्यांनी वेळोवेळी पुढाकार घेतला आहे. सामाजिक बांधिलकी जपत गावातील विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. यावेळी जिजाऊ मित्र परिवाराच्या सदस्यांनी, "वाल्मीकदादा हे आमचे मार्गदर्शक आहेत. त्यांच्या नेतृत्वात बाभळे गाव निश्चितच विकासाच्या पथावर अग्रेसर होईल," असा विश्वास व्यक्त केला. वाढदिवसानिमित्त ग्रामस्थ, सहकारी शेतकरी, मित्रपरिवार आणि कुटुंबीयांकडून श्री. वाल्मीक गोकुळ पाटील यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

उदय सामंतांचा धुळ्यात शिवसेना पदाधिकाऱ्यांना घरचा आहेर!

जन सम्राट टाईम्स



धुळे। प्रतिनिधी: धुळे जिल्ह्यातील शिवसेनेच्या आढावा बैठकीत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पदाधिकाऱ्यांच्या अंतर्गत गटबाजीवर तीव्र नाराजी व्यक्त करत चांगलेच कान टोचले. 'मित्रपक्षांकडून चुकीची वागणूक मिळते, अशी तक्रार करण्यापेक्षा आधी आपल्या आपल्यात काय चालले आहे, हे पाहा. तुम्हीच समोरच्यांना संधी देत आहात,' अशा शब्दांत सामंत यांनी पदाधिकाऱ्यांना सुनावले. 'आपल्याला गटबाजी महत्त्वाची आहे की एकनाथ शिंदे साहेब महत्त्वाचे आहेत?' असा थेट सवालही त्यांनी उपस्थित केला. धुळे जिल्ह्यातील अंतर्गत गटबाजीचा विषय गंभीर असल्याचे सांगत, यापुढेही गटबाजी सुरू राहिल्यास जिल्ह्यात नवीन टीम करण्याबाबत एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून निर्णय घेणार असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले. 'कालपासून मला कित्येक फोन आले. हा चांगला, तो वाईट, अशा प्रकारचे मोठ्या प्रमाणात फोन आले,' असा गौप्यस्फोट करत सामंत यांनी पदाधिकाऱ्यांमधील परस्पर तक्रारींवरही नाराजी व्यक्त केली. 'चांगलं काम करा, मंचावरील मंडळींना हटवून तुम्हाला संधी मिळेल' समोर बसलेल्या कार्यकर्त्यांना उद्देशून सामंत म्हणाले की, 'तुम्ही चांगले काम करा. मंचावरील मंडळींना हटवून तुम्हाला संधी मिळेल.' मात्र त्यासाठी कार्यकर्त्यांनी पक्ष संघटना मजबूत करण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. शिंदे यांच्या लंडन दौऱ्यादरम्यान त्यांचे भाषण संपल्यानंतर धुळ्यातील अंतर्गत गटबाजीबाबत आपण त्यांच्याशी चर्चा केल्याचेही सामंत यांनी बैठकीत सांगितले. अंतर्गत गटबाजी करणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांना ही शेवटची संधी असल्याचा इशाराही त्यांनी दिला. उपस्थितीवरही नाराजी शिवसेनेच्या आढावा बैठकीला अपेक्षेप्रमाणे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित नसल्याने उदय सामंत यांनी नाराजी व्यक्त केली. धुळे जिल्ह्यातील संघटनात्मक परिस्थितीवर भाष्य करताना त्यांनी 'महाराष्ट्रात सर्वाधिक माजी सरकार धुळ्यात झाले' अशी टिप्पणी केली. तसेच महाराष्ट्रात सर्वाधिक अंतर्गत गटबाजी धुळे जिल्ह्यात आढळत असल्याची खंत व्यक्त केली. पक्षाच्या कार्यक्रमांदरम्यानही एकमेकांचा अंतर्गत विरोध दिसून येऊ नये, याची काळजी घेतली जात असल्याचे सांगत सामंत यांनी यावरही नाराजी व्यक्त केली. 'मंचावरची सर्व मंडळी जर एकत्र आली, तर जिल्ह्यात एकमेव पक्ष असेल आणि तो म्हणजे फक्त शिवसेना,' असे सांगत त्यांनी एकजुटीचा संदेश दिला. अजितदादांच्या वक्तव्याचा दाखला देत कार्यकर्त्यांना सुनावले उदय सामंत यांनी आपल्या भाषणादरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भाषणाचा दाखला देत कार्यकर्त्यांचे कान टोचले.

कनिष्ठ न्यायालयाच्या अधिकारांवर गदा आणण्याचा प्रयत्न?

कलम १५५ च्या वापराबाबत तहसीलदारांविरोधात तक्रार

जन सम्राट टाईम्स

भडगाव। प्रतिनिधी: महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम १५५ अंतर्गत असलेल्या दुरुस्ती अधिकारांचा कथित गैरवापर करून न्यायालयीन प्रक्रियेला बगल देण्यात आल्याचा आरोप भडगावच्या तहसीलदार श्रीमती शीतल सोलाट यांच्याविरोधात करण्यात आला आहे. या प्रकरणी शिवसेना (शिंदे गट) शहरप्रमुख नंदकिशोर रमेश पाटील (बबलू देवरे) यांनी नाशिक विभागीय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेत नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाच्या भूसुधार शाखेने जळगाव जिल्हाधिकाऱ्यांना प्रकरणाची सविस्तर चौकशी करून, तथ्य आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे भडगावच्या महसूल विभागात या प्रकरणाची चर्चा सुरू झाली आहे. कलम १५५ च्या वापरावर प्रश्नचिन्ह? महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम १५५ अंतर्गत महसुली अभिलेखांमधील



लेखनप्रमाद अथवा स्पष्ट स्वरूपाच्या चुका दुरुस्त करण्याची तरतूद आहे. मात्र, तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, या अधिकाराचा वापर काही प्रकरणांमध्ये केवळ लिपिकीय किंवा तांत्रिक चूक दुरुस्त करण्यापुरता मर्यादित न राहता महसुली नोंदींवर परिणाम करणाऱ्या स्वरूपात करण्यात आल्याचा आरोप आहे. याच पार्श्वभूमीवर संबंधित कार्यवाहीची कायदेशीरता आणि अधिकारक्षेत्राची मर्यादा तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. न्यायालयीन वाद सुरू असताना महसुली नोंदीत हस्तक्षेप? तक्रारीतील माहितीनुसार, संबंधित जमीन व महसुली नोंदींबाबत दिवाणी अथवा कनिष्ठ न्यायालयात वाद प्रलंबित असताना कलम १५५ अंतर्गत कार्यवाही करण्यात आल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे. एखाद्या जमिनीच्या मालकी, हक्क किंवा ताब्याबाबत मूलभूत वाद न्यायालयासमोर प्रलंबित असताना महसूल अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा त्या न्यायालयीन वादावर परिणाम झाला का, तसेच अशी कार्यवाही करण्याचा महसूल अधिकाऱ्यांना अधिकार होता का, याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे. त्यामुळे या प्रकरणात महसूल प्रशासनाच्या अधिकारांची मर्यादा आणि न्यायालयीन प्रक्रियेचा सन्मान हे दोन महत्त्वाचे मुद्दे समोर आले आहेत. तहसीलदारांविरोधात विभागीय चौकशीची मागणी तक्रारदार नंदकिशोर पाटील यांनी प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित तहसीलदारांविरुद्ध विभागीय चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास निलंबनासह कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, तसेच कथित गैरप्रकाराची जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

ट्रेंडला बळी पडू नका; फोटो अपलोड करण्यापूर्वी सावध राहा

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: सोशल मीडियावर सध्या '१९८० लुक'चे फोटो तयार करण्याचा ट्रेंड मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. या ट्रेंडमध्ये नागरिक विशेषतः तरुण मंडळी थर्ड पार्टी ॲप्लिकेशनवर स्वतःचे तसेच कुटुंबीयांचे फोटो अपलोड करून ते १९८०च्या दशकातील छायाचित्रांसारखे तयार करून घेत आहेत. मात्र, अशा ॲप्सचा वापर करताना वैयक्तिक माहिती आणि फोटोच्या गोपनीयतेबाबत नागरिकांनी सावध राहण्याची गरज असल्याचे आवाहन ॲड. चैतन्य भंडारी यांनी केले आहे. सध्या सोशल मीडियावर आपला फोटो अपलोड करून 'हा फोटो १९८०च्या दशकातील फोटोसारखा करून द्या', अशी मागणी केल्यानंतर संबंधित ॲप्लिकेशन कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून त्या फोटोला जुन्या काळातील लूक देते. त्यामुळे हा ट्रेंड अल्पावधीतच मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय झाला आहे. मात्र, अशा ॲप्लिकेशनवर फोटो अपलोड करताना नागरिकांनी केवळ फोटोच नव्हे, तर आपल्या चेहऱ्याशी संबंधित काही संवेदनशील माहिती तृतीय पक्षाकडे जाण्याची शक्यता लक्षात घेणे आवश्यक आहे. चेहऱ्याची ठेवण, हावभाव आणि अन्य बायोमेट्रिक स्वरूपाची माहिती भविष्यात गैरवापरली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी चिंता ॲड. भंडारी यांनी व्यक्त केली. 'फोटो देताना गोपनीयतेचाही विचार करा' प्रत्येक ट्रेंडचा विचार न करता केवळ सोशल मीडियावर तो लोकप्रिय आहे म्हणून त्याचे अनुकरण करणे योग्य नाही. आपले वैयक्तिक आणि कौटुंबिक फोटो कोणत्या ॲपवर अपलोड करत आहोत, त्या ॲपची विश्वासार्हता काय आहे आणि आपल्या फोटोचा वापर कशासाठी होऊ शकतो, याचा विचार नागरिकांनी करणे गरजेचे आहे. विशेषतः लहान मुले, कुटुंबीय आणि खासगी स्वरूपाचे फोटो कोणत्याही अनोळखी किंवा अविश्वसनीय थर्ड पार्टी ॲपवर अपलोड करणे टाळावे. सोशल मीडिया ट्रेंडपेक्षा डिजिटल गोपनीयता आणि वैयक्तिक माहितीची सुरक्षितता अधिक महत्त्वाची असल्याचे ॲड. भंडारी यांनी सांगितले.

धुळ्यात उद्योगमंत्री उदय सामंतांना मराठा आंदोलकांचा घेराव



जन सम्राट टाईम्स

धुळे| प्रतिनिधी: मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभर आंदोलनाची धग कायम असतानाच धुळे जिल्हा दौऱ्यावर आलेले उद्योगमंत्री उदय सामंत यांना मराठा आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावरच घेराव घातला. यावेळी आंदोलकांनी विविध मागण्या मांडत सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. उद्योगमंत्री सामंत यांनी आंदोलकांचे म्हणणे ऐकून घेत त्यांच्या मागण्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे आंतरवाली सराटी येथे गेल्या बारा दिवसांपासून आमरण उपोषणाला बसले आहेत. मागण्या मान्य होत नसल्याने मराठा समाजातील आंदोलक राज्यभर रस्त्यावर उतरले असून आंदोलन अधिक तीव्र होताना दिसत आहे. जरांगे पाटील यांच्या प्रकृतीबाबतही आंदोलकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. मराठा आरक्षणाच्या उपसमितीमध्ये उद्योगमंत्री उदय सामंत यांचा समावेश असल्याने धुळे जिल्ह्यातील मराठा आंदोलकांनी त्यांची भेट घेतली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावरच आंदोलकांनी त्यांना घेराव घालत विविध प्रश्नांवर जाब विचारला. यावेळी आंदोलकांनी आपल्या मागण्यांचे निवेदनही उद्योगमंत्री सामंत यांच्याकडे सुपूर्द केले. आंदोलकांच्या भावना समजून घेत उद्योगमंत्री सामंत यांनी त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे मराठा आंदोलकांच्या पुढील भूमिकेकडे लक्ष लागले आहे. यावेळी मराठा समाजाचे भानुदास बगदे, विनोद जगताप, निंबा मराठे, उल्हास यादव, अमर फरताडे, श्याम निरगुडे, मनोज ढवळे, हेमंत भडक, भैय्या शिंदे, प्रफुल माने, संतोष लकडे यांच्यासह मोठ्या संख्येने मराठा समाज बांधव उपस्थित होते.

कर्जत-CSMT लोकल ठरली मैत्रीच्या पार्टीची लोकल!

धावत्या लोकलमध्ये समोसा स्नेहभोजन; रुपेश पवार यांच्याकडून बदलापूर मित्रपरिवाराला अनोखी मेजवानी

जन सम्राट टाईम्स

बदलापूर/मुंबई । प्रतिनिधी लाईफलाईन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मध्य रेल्वेच्या कर्जत-CSMT लोकलमध्ये शुक्रवारी रोजच्या धावपळीच्या प्रवासाला मैत्रीच्या आनंदाची अविस्मरणीय जोड मिळाली. बदलापूरच्या मित्रपरिवाराने चक्क धावत्या लोकलमध्येच समोसा पार्टी साजरी करत प्रवासाचा आनंद द्विगुणित केला. मोबाईलवर गणपतीची भक्तिगीते, हातात गरमागरम समोसा आणि मित्रांच्या गप्पा, अशा आनंदी वातावरणामुळे संपूर्ण प्रवास संस्मरणीय ठरला. या अनोख्या उपक्रमाची संकल्पना ग्रुपचे सक्रिय सदस्य तथा पत्रकार विजयकुमार पाटील यांची होती. रोजच्या कामानिमित्त कर्जत-CSMT लोकलने प्रवास करणाऱ्या मित्रांचा हा समूह गेल्या अनेक वर्षांपासून एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होत आला आहे. या मैत्रीला आणखी एक सुंदर आठवण जोडावी, या उद्देशाने लोकलमध्ये स्नेहभोजनाचा विचार पुढे आला. या संकल्पनेला प्रतिसाद देत बदलापूरचे सुपरिचित आणि दिलदार व्यक्तिमत्त्व रुपेश पवार यांनी सर्व मित्रांसाठी समोसा, चटणी आणि पाण्याची व्यवस्था केली. लोकल कर्जतहून



मार्गस्थ झाल्यानंतर बदलापूर स्थानकाजवळ पोहोचताच समोस्याचा सुगंध दरवळला आणि मित्रांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. त्यातच गणपतीची गाणी सुरू असल्याने प्रवासाला भक्तिमय वातावरणाचीही जोड मिळाली. "लोकलने आम्हाला केवळ मुंबईत नेले नाही, तर एकमेकांशी जोडले आहे. रोजचा प्रवास कंटाळवाणा न वाटता आनंददायी व्हावा आणि मित्रमैत्रिणींमध्ये आपुलकी कायम राहावी, यासाठी हा छोटासा प्रयत्न होता," असे पत्रकार विजयकुमार पाटील यांनी सांगितले. या मैत्रीच्या स्नेहभोजनात पत्रकार विजयकुमार पाटील, सुनील, पंकज, राजू भाई, मेडिकल, मधुबन, यश, निखिल, सर्वांचे लाडके मामा, 'A.C.', बदलापूरचे 'नाना पाटेकर' म्हणून परिचित खोपकर, विवेक, माने आदी सदस्य सहभागी झाले. मात्र, सर्वांचा लाडका विशाल यावेळी गैरहजर होता. धावत्या लोकलमध्ये काही क्षणांसाठी का होईना, रोजच्या कामाचा ताण बाजूला ठेवून मित्रांनी हास्य-विनोद, गप्पा आणि स्नेहभोजनाचा आनंद घेतला. मैत्रीला मोठ्या सोहळ्याची गरज नसते; छोट्या उपक्रमातूनही मोठा आनंद निर्माण करता येतो, याचा सुंदर अनुभव या समोसा पार्टीने दिला. मुंबईची लाईफलाईन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मध्य रेल्वेच्या कर्जत-CSMT लोकलमध्ये शुक्रवारी रोजच्या धावपळीच्या प्रवासाला मैत्रीच्या आनंदाची अविस्मरणीय जोड मिळाली. बदलापूरच्या मित्रपरिवाराने चक्क धावत्या लोकलमध्येच समोसा पार्टी साजरी करत प्रवासाचा आनंद द्विगुणित केला. मोबाईलवर गणपतीची भक्तिगीते, हातात गरमागरम समोसा आणि मित्रांच्या गप्पा, अशा आनंदी वातावरणामुळे संपूर्ण प्रवास संस्मरणीय ठरला.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

‘झाडं माझ्या मुक्ताईचं’ उपक्रमाचा हरताळे येथून शुभारंभ

योगमाया प्रतिष्ठानच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संकल्प; वर्षभरात ९०५ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी

जन सम्राट टाईम्स

मुक्ताईनगर । प्रतिनिधी: सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या योगमाया प्रतिष्ठानच्या प्रथम वर्धापन दिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने ‘झाडं माझ्या मुक्ताईचं’ या महत्त्वाकांक्षी वृक्षारोपण उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. नूतन माध्यमिक विद्यालय, हरताळे येथून या स्तुत्य उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमांतर्गत संपूर्ण मुक्ताईनगर तालुक्यात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार असून, कडुलिंब, पिंपळ, वड, आंबा, आवळा यांसह विविध औषधी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प प्रतिष्ठानने केला आहे. केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या झाडांचे संवर्धन आणि संगोपन करण्यावरही विशेष भर देण्यात येणार आहे. योगमाया प्रतिष्ठानने आपल्या स्थापनेपासूनच्या पहिल्याच वर्षात विविध समाजाभिमुख उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपली आहे. प्रतिष्ठानच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त वर्षभरातील सामाजिक कार्याचा आढावा घेण्यात आला. संस्थेची नोंदणी प्रक्रिया देखील यशस्वीरीत्या पूर्ण झाली असून, वर्षपूर्ती उत्साहात साजरी करण्यात आली. वर्षभरातील उल्लेखनीय सामाजिक उपक्रम ९०५रुग्णांचीमोफतआरोग्यतपासणी आदिशक्ती मुक्ताबाई यात्रोत्सव २०२६ निमित्त प्रतिष्ठानच्या वतीने तीन दिवसीय भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तब्बल ९०५ भाविक व रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी गरजू रुग्णांना मोफत औषधांचे वाटपही करण्यात आले. ५०१ विद्यार्थ्यांचा निबंध स्पर्धेत सहभाग



युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त तालुकास्तरीय भव्य निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तब्बल ५०१ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या लेखणीतून छत्रपती शिवरायांना अभिवादन केले. यासोबतच शिवतीर्थ येथे पोवाड्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांना सांस्कृतिक अभिवादन करण्यात आले. परिचारिकांचा ‘उत्कृष्ट सेवा सन्मान’ जागतिक परिचारिका दिनाचे औचित्य साधून उपजिल्हा रुग्णालय, मुक्ताईनगर येथे रुग्णसेवेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिला व पुरुष परिचारिकांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्या सेवाभावी कार्याचा प्रतिष्ठानच्या वतीने यावेळी सन्मान करण्यात आला. ‘एक राखी देश के नाम’ उपक्रमातून जवानांना अभिवादन रक्षाबंधनानिमित्त तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या हॅन्डमेड राख्या, शुभेच्छापत्रे आणि सैनिकांसाठी पत्रे तयार केली. योगमाया प्रतिष्ठानच्या वतीने या राख्या व पत्रे मिलिटरी स्टेशन, भुसावळ येथे नेऊन देशाच्या जवानांना सुपूर्द करण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. आगामी काळातही समाजहिताचे उपक्रम राबविण्याचा संकल्प योगमाया प्रतिष्ठानच्या माध्यमातून आगामी काळातही समाजहित, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, शिक्षण आणि जनकल्याणाशी संबंधित विविध उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अश्विन सुरवाडे यांच्यासह संकेत कपले, सनत जैन, मयूर पाटील, तेजस सापधरे, मनीष महाजन, अनिल गवते, रूपेश कोळी, विश्वजित देशमुख, प्रवीण राठोड तसेच ११ सदस्यीय मंडळ आणि सर्व सदस्यांचे या सामाजिक कार्यासाठी मोलाचे योगदान लाभत आहे. योगमाया प्रतिष्ठानच्या पहिल्याच वर्षातील सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक, देशभक्तीपर आणि पर्यावरणपूरक उपक्रमांचे विविध स्तरांतून कौतुक होत असून, ‘झाडं माझ्या मुक्ताईचं’ या वृक्षारोपण उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाच्या कार्याला आणखी व्यापक स्वरूप मिळणार आहे.सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या योगमाया प्रतिष्ठानच्या प्रथम वर्धापन दिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने ‘झाडं माझ्या मुक्ताईचं’ या महत्त्वाकांक्षी वृक्षारोपण उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. नूतन माध्यमिक विद्यालय, हरताळे येथून या स्तुत्य उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमांतर्गत संपूर्ण मुक्ताईनगर तालुक्यात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार असून, कडुलिंब, पिंपळ, वड, आंबा, आवळा यांसह विविध औषधी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प प्रतिष्ठानने केला आहे. केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या झाडांचे संवर्धन आणि संगोपन करण्यावरही विशेष भर देण्यात येणार आहे. योगमाया प्रतिष्ठानने आपल्या स्थापनेपासूनच्या पहिल्याच वर्षात विविध समाजाभिमुख उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपली आहे. प्रतिष्ठानच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त वर्षभरातील सामाजिक कार्याचा आढावा घेण्यात आला. संस्थेची नोंदणी प्रक्रिया देखील यशस्वीरीत्या पूर्ण झाली असून, वर्षपूर्ती उत्साहात साजरी करण्यात आली. वर्षभरातील उल्लेखनीय उपक्रम ९०५रुग्णांचीमोफतआरोग्यतपासणी आदिशक्ती मुक्ताबाई यात्रोत्सव २०२६ निमित्त प्रतिष्ठानच्या वतीने तीन दिवसीय भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

सार्वजनिक बांधकाम विभागाचा उत्कृष्ट सेवा पुरस्कार इंजि. तायडे यांना जाहीर

जन सम्राट टाईम्स



पारोळा | प्रतिनिधी : उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, प्रशासकीय कार्यक्षमता व कर्तव्यनिष्ठेची महाराष्ट्र शासनाकडून दखल; शेतरस्ते, रस्ते-पूल व शासकीय इमारतींच्या कामांना दिली गती मलकापूर प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दरवर्षी प्रदान करण्यात येणारा मानाचा राज्यस्तरीय उत्कृष्ट सेवा पुरस्कार सन २०२५-२०२६ या कालावधीसाठी जाहीर झाला आहे. तांत्रिक संवर्गातील (स्थापत्य) सहायक अभियंता श्रेणी-१ इंजि. सचिन निवृत्ती तायडे यांना वैयक्तिक उत्कृष्ट सेवा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ११ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार या पुरस्काराची घोषणा करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राज्यभरात रस्ते, पूल, शासकीय इमारती तसेच विविध पायाभूत सुविधांची कामे केली जातात. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, तांत्रिक कौशल्य, प्रभावी नियोजन, प्रशासकीय समन्वय आणि कामांची गुणवत्तापूर्ण व वेळेत अंमलबजावणी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत शासनाच्या वतीने उत्कृष्ट सेवा पुरस्काराने गौरव करण्यात येतो. भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या १५ सप्टेंबर या जन्मदिनाचे औचित्य साधून दरवर्षी ‘अभियंता दिन’ साजरा केला जातो.

या दिनानिमित्त सार्वजनिक बांधकाम विभागात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील निवडक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येते. शेतरस्त्यांच्या कामांना दिली गती मलकापूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक अभियंता श्रेणी-१ इंजि. सचिन निवृत्ती तायडे यांनी आपल्या कार्यकाळात उत्कृष्ट तांत्रिक कौशल्यासोबतच प्रशासकीय पकड आणि कर्तव्यनिष्ठेचे दर्शन घडविले.

विशेषतः शेतरस्त्यांच्या कामांचे योग्य नियोजन करून अनेक वर्षांपासून शेतरस्त्यांच्या सुविधेपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना त्यांनी मोठा दिलासा दिला. शेतरस्त्यांची कामे ही तांत्रिकदृष्ट्या किचकट आणि वेळखाऊ असल्याने अनेकदा त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र, इंजि. तायडे यांनी शेतरस्त्यांची कामे ही केवळ शासकीय जबाबदारी न मानता शेतकऱ्यांची सेवा म्हणून पाहिली.

त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनेक शेतरस्त्यांची कामे पूर्णत्वास नेण्यात आली असून, अनेक कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. तसेच काही कामांचे प्रस्तावही प्रक्रियेत आहेत. रस्ते-पुलांमुळे गावांची जोडणी इंजि. तायडे यांच्या कार्यकाळात अनेक गावांना रस्ते व पुलांच्या माध्यमातून परस्पर जोडण्याच्या कामांना चालना मिळाली. पूर्वी रस्ते व पुलांच्या अभावामुळे एकमेकांपासून तुटलेल्या अनेक गावांना आता दळणवळणाची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांच्या दैनंदिन वाहतुकीला मोठा फायदा झाला आहे

टायगर इंटरनॅशनल स्कूलच्या नूतन ग्रंथालयाचे उद्घाटन!

जन सम्राट टाईम्स



पारोळा। प्रतिनिधी: पारोळा तालुक्यातील टायगर इंटरनॅशनल स्कूलच्या नूतन ग्रंथालयाचे उद्घाटन तसेच जळगाव जिल्ह्यातील योग शिक्षकांचा सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या दोन्ही कार्यक्रमांना प्रमुख पाहुणे म्हणून आमदार ॲड. अमोलदादा पाटील उपस्थित होते. त्यांच्या हस्ते नूतन ग्रंथालयाचे उद्घाटन करण्यात आले, तसेच उल्लेखनीय कार्य करणाऱ्या योग शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार ॲड. अमोलदादा पाटील म्हणाले, “ग्रंथालय हे केवळ पुस्तकांनी भरलेली जागा नसून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारे आणि त्यांच्या विचारांना व्यापक करणारे ज्ञानमंदिर आहे.” आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि इंटरनेटच्या माध्यमातून माहिती सहज उपलब्ध होत असली, तरी पुस्तक वाचनातून मिळणारी एकाग्रता, चिंतनशीलता आणि सखोल ज्ञान याला पर्याय नाही. विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावून घेत आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले. योग शिक्षकांच्या कार्याचा गौरव योग शिक्षकांच्या सत्कारप्रसंगी आमदार पाटील यांनी योगाचे महत्त्व अधोरेखित केले.समाजातील प्रत्येक घटकापर्यंत योग पोहोचविण्यासाठी योग शिक्षक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असून, त्यांच्या कार्याचा सन्मान करणे म्हणजे निरोगी समाजाच्या निर्मितीत त्यांच्या योगदानाचा गौरव करणे होय, असेही त्यांनी सांगितले. ‘ज्ञानवान पिढी आणि निरोगी समाज’ हीच विकासाची दिशा ‘ज्ञानवान पिढी आणि निरोगी समाज’ हीच आपल्या विकासाची खरी दिशा असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच वाचन, योग, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांचा स्वीकार करावा, असे आवाहन आमदार पाटील यांनी केले. पारोळ्यातील शैक्षणिक क्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या टायगर इंटरनॅशनल स्कूलमध्ये साकारण्यात आलेले हे नूतन ग्रंथालय विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे नवे दालन खुले करेल. त्याचप्रमाणे योग शिक्षकांचा करण्यात आलेला सन्मान त्यांच्या कार्याला निश्चितच नवी ऊर्जा देईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील, शिवसेना शहरप्रमुख, गटनेते तथा नगरसेवक अमृतभाऊ चौधरी, शिवसेना प्रतोद तथा नगरसेवक नितीनभाऊ सोनार, माजी उपनगराध्यक्ष सुदामबापू चौधरी, दीपकभाऊ अनुष्ठान, नगरसेवक भूषणभाऊ टिपरे, टायगर इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक रविंद्र पाटील सर, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र चौधरी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

वती येथे पारंपरिक वग्दी सण उत्साहात

अडीचशे ते तीनशे वर्षांची परंपरा कायम

जन सम्राट टाईम्स

बोदवड । (प्रतिनिधी): बोदवड तालुक्यातील येवती येथे सालाबादाप्रमाणे यंदाही पारंपरिक वग्दी सण मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. अडीचशे ते तीनशे वर्षांची परंपरा लाभलेल्या या अनोख्या सणाला ग्रामस्थांसह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. विशेष म्हणजे वग्दी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पावसाचे आगमन झाल्याने ग्रामस्थांच्या आनंदात आणखी भर पडली.

येवतीचे ग्रामदैवत श्री बहिरोबा महाराज यांच्यावर ग्रामस्थांची अपार श्रद्धा आहे. वग्दीचा आशीर्वाद घेतल्यास संततीप्राप्ती होते, अशी भाविकांची श्रद्धा असल्याने सकाळपासूनच बहिरोबा महाराजांच्या दर्शनासाठी मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. संबळ-भारूडाच्या गजरात मानाच्या बैलगाडीची मिरवणूक सायंकाळच्या सुमारास मानकऱ्यांनी संबळ, भारूड, गोंधळ, कीर्तन आणि डफाच्या सवाद्य गजरात मानाच्या



बैलगाडीची ावातून प्रदक्षिणा काढली. यावेळी *‘बहिरोबा महाराज की जय’*च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. गुलालाची उधळण, पारंपरिक वाद्यांचा गजर आणि भाविकांचा उत्साह यामुळे गावातील वातावरण चैतन्यमय झाले होते. मिरवणुकीनंतर मानाच्या बैलगाडीची विधिवत पूजा करण्यात आली. सात दिवस आधीपासून तयारी; वग्दीचा मान विश्वनाथ धनगर यांना दरवर्षी पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी वग्दीची मिरवणूक काढण्याची परंपरा आहे. या सोहळ्यासाठी गावात तब्बल सात दिवस अगोदरपासून तयारी सुरू केली जाते. यंदा वग्दीचा मान विश्वनाथ धनगर यांना मिळाला. पोळ्याच्या दिवसापासून वग्दी निरंकार उपवास धरतात आणि त्यानंतर या पारंपरिक धार्मिक सोहळ्याला सुरुवात होते. अशी आहे वग्दीची अनोखी पारंपरिक पद्धत वग्दी सणातील पारंपरिक पद्धत अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. यासाठी बैलगाडी सजवून गाडीमध्ये तराजूच्या काट्यासारखी एक काठी बांधली जाते. या काठीच्या एका बाजूला वग्दी म्हणून व्यक्ती बसवली जाते, तर दुसऱ्या बाजूला त्याच वजनाची वाळू बांधली जाते. त्यानंतर ही संपूर्ण रचना गोल फिरवली जाते आणि गावातून पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात येते. अनेक पिढ्यांपासून सुरू असलेली ही आगळीवेगळी परंपरा आजही येवती ग्रामस्थांनी श्रद्धा आणि उत्साहाने जपली आहे

भाजप किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष; डॉ. भगवानदादा मुरुमकर यांचा यशस्वी राजकीय प्रवास

जन सम्राट टाईम्स

अहिल्यानगर। प्रतिनिधी: जामखेड - गेल्या २५ वर्षांपासून भारतीय जनता पक्षाशी एकनिष्ठ राहून तळागाळात सातत्याने काम करणारे ज्येष्ठ नेते आणि जामखेड पंचायत समितीचे माजी सभापती डॉ. भगवानदादा मुरुमकर यांची भाजप किसान मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पुढाकारातून त्यांच्या दीर्घकालीन राजकीय व सामाजिक कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. त्यांच्या निवडीमुळे जामखेड तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुंबई येथील भाजप प्रदेश कार्यालयात नुकताच निवडीचा अधिकृत सोहळा पार पडला.

यावेळी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी डॉ. मुरुमकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



विविध पदांवर उल्लेखनीय कार्य डॉ. भगवानदादा मुरुमकर हे जामखेड तालुक्यातील अभ्यासू, अनुभवी आणि संघटनात्मक पकड असलेले नेतृत्व म्हणून परिचित आहेत. साकतचे सरपंच — ५ वर्षे : सरपंच म्हणून कार्यरत असताना गावातील विविध विकासकामांना चालना देत साकत गावाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले. पंचायत समिती सदस्य — १० वर्षे : तालुक्यातील ग्रामीण भागातील प्रश्न सभागृहात मांडत त्यांच्या सोडवणुकीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. पंचायत समिती सभापती — ५ वर्षे : सलग पाच वर्षे सभापतीपदाची जबाबदारी सांभाळताना पंचायत समितीच्या कारभारावर आपल्या कार्यपद्धतीचा ठसा उमटवला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी व्यापक व्यासपीठ उभारण्याची अपेक्षा डॉ. मुरुमकर हे व्यवसायाने पशुवैद्यकीय सेवेत असल्याने त्यांचा शेतकरी आणि ग्रामीण भागाशी जवळचा संबंध आहे. त्यातच पंचायत समितीचे सभापती म्हणून काम केल्यामुळे तालुक्यातील विविध गावांशी आणि शेतकरी बांधवांशी त्यांची नाळ घट्ट जोडलेली आहे. सध्या राज्यातील अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने शेतकरी अडचणींचा सामना करीत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना शासन तसेच पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर प्रभावीपणे मांडून बळीराजाला न्याय मिळवून देण्यासाठी डॉ. मुरुमकर महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास भाजप कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. मान्यवरांची उपस्थिती मुंबई येथे झालेल्या निवड सोहळ्याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य अशोक काका खेडकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शरद दादा काळे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष अजय दादा काशीद, बापूराव ढवळे, माजी उपसभापती रवी दादा सुतवसे, माजी जिल्हा परिषद सदस्य सोमनाथ पाचरणे, राहुल चोरगे, भाऊ गरड यांच्यासह पक्षाचे अनेक प्रमुख पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार पाच पात्र कर्मचाऱ्यांना वारसा हक्काने नियुक्ती

पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार न्याय देण्याचा नगराध्यक्षांचा प्रशासनाला निर्देश

जन सम्राट टाईम्स

पारोळा। प्रतिनिधी: महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील सुधारित कलम ७६, स्थायी निर्देश क्रमांक २३, लाड-पागे समितीच्या शिफारशी तसेच शासन निर्णय दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ मधील सुधारित तरतुदी आणि शासनाच्या प्रचलित नियम व मार्गदर्शक सूचनांनुसार पारोळा नगरपरिषदेतील पाच पात्र कर्मचाऱ्यांना वारसा हक्काने नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. पारोळा नगरपरिषदेच्या सभागृहात आयोजित सर्वसाधारण सभेत लोकनियुक्त नगराध्यक्ष दादासाहेब चंद्रकांत बी. पाटील, उपनगराध्यक्ष ॲड. रोहनदादा



मोरे, मुख्याधिकारी तुषार नेरकर, गटनेते, सभापती तसेच नगरपरिषदेचे सर्व सन्माननीय नगरसेवक व नगरसेविका यांच्या उपस्थितीत नियुक्ती आदेशांचे वाटप करण्यात आले. प्रलंबित प्रकरणांचा घेतला आढावा सभेदरम्यान लाड-पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने वारसा हक्काने नियुक्तीच्या प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. संबंधित पात्र उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियम, अटी व पात्रतेनुसार न्याय देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थित सदस्यांनी आपापली मते मांडत पात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणांचा नियमानुसार तसेच संवेदनशीलतेने विचार करण्याची आवश्यकता व्यक्त केली. नियुक्ती प्रक्रिया शासनाच्या मार्गदर्शक सूचना, उपलब्ध पदे, आवश्यक पात्रता आणि संबंधित कायदेशीर तरतुदींचे पालन करून पारदर्शक पद्धतीने राबविण्याबाबतही चर्चा करण्यात आली. पात्र कर्मचाऱ्यांना योग्य न्याय देण्याचे नगराध्यक्षांचे निर्देश लोकनियुक्त नगराध्यक्ष दादासाहेब चंद्रकांत भिकनराव पाटील यांनी सांगितले की, नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांच्या वारसा हक्काने नियुक्तीच्या प्रकरणांमध्ये शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून पात्र व्यक्तींना योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी. मुख्याधिकारी श्री. तुषार नेरकर यांनी सभेस संबंधित प्रकरणांची वस्तुस्थिती, उपलब्ध पदे, पात्रता तसेच शासनाच्या निर्देशांची माहिती दिली. पाच जणांना नियुक्ती आदेश लाड-पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने वारसा हक्काने नोकरीचे नियुक्ती आदेश पुढील पात्र लाभार्थ्यांना प्रदान करण्यात आले : यावेळी प्रशासन अधिकारी श्रीमती यामिनी लक्ष्मणसा जटे, कार्यालय अधीक्षक अनिल भाऊसाहेब तिदमे, लेखाधिकारी दीपक अशोकराव महाजन, अंतर्गत लेखापरीक्षक सार्थक मोरस्कर, स्थापत्य अभियंता सुमित पाटील, सहाय्यक प्रकल्प अधिकारी चंद्रकांत महाजन, सभा अधीक्षक किशोर चौधरी यांच्यासह नगरपरिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

डेंग्यू-मलेरियासह तंबाखूमुक्तीबाबत जनजागृती

जन सम्राट टाईम्स

धरणगाव| प्रतिनिधी: महात्मा फुले हायस्कूल, धरणगाव येथे शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय चव्हाण तसेच वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कीटकजन्य आजार व आरोग्य शिक्षणाबाबत डॉ. शुभम जाधव आणि MPW पी. एस. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना डेंग्यू, मलेरिया व हत्तीरोग याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या आजारांची प्रमुख लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय तसेच डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी घर व परिसरात पाणी साचू न देणे, नियमित स्वच्छता राखणे आणि आरोग्याची काळजी घेणे यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. तसेच तंबाखूमुक्ती आणि तंबाखूमुळे होणाऱ्या ‘मूक कॅन्सर’बाबत डॉ. मयूर जैन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहावे आणि व्यसनमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना जेवणापूर्वी आणि शौचालयानंतर हात स्वच्छ धुणे, नियमित दात घासणे, वैयक्तिक स्वच्छता राखणे, स्वच्छ व सुरक्षित पाणी पिणे तसेच परिसर स्वच्छ ठेवणे याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्यविषयक सवयी लहान वयातच अंगीकारल्यास अनेक आजारांपासून बचाव करता येतो.

आमदार-खासदारांनंतर आता नगरसेवकांच्या नातेवाईकांच्या वाहनांवर 'लोगो' थाट!

वाहनांवर ओळखचिन्ह लावण्याचा नवा ट्रेंड; नियम सर्वांसाठी समान आहेत का?

जन सम्राट टाईम्स

मलकापूर । प्रतिनिधी: शहरात वाहनांवर पदनाम, लोगो अथवा विशेष ओळखचिन्ह लावण्याचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. काही वर्षांपूर्वी आमदार, विधानपरिषद सदस्य तसेच खासदार यांच्या वाहनांवर पदाशी संबंधित लोगो अथवा ओळखचिन्ह लावल्याची चर्चा होती. आता नगरसेवकांच्या नावाचा अथवा पदाचा लोगो त्यांच्या नातेवाईकांच्या वाहनांवर झळकत असल्याचे दिसून येत असल्याने शहरात नव्या चर्चेला उधाण आले आहे. वाहनांवर अशा प्रकारचे पदनाम, लोगो किंवा विशेष ओळखचिन्ह लावण्यास नेमकी कोणती परवानगी आहे, याबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. संबंधित वाहनधारकांना अशा प्रकारचा लोगो वापरण्याची अधिकृत परवानगी आहे का? असल्यास त्यासाठीचे नियम व निकष कोणते आहेत? आणि परवानगी नसल्यास संबंधित यंत्रणा याबाबत कोणती कारवाई करणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पद कोणतेही असो, नियम मात्र सर्वांसाठी समान हवेत लोकप्रतिनिधी असो अथवा सामान्य नागरिक, वाहनांवर नियमबाह्य चिन्हांचा वापर होत असल्यास संबंधित यंत्रणेने त्याची तपासणी करून नियमानुसार कारवाई करणे अपेक्षित आहे. सामान्य वाहनधारकांवर नियमांची अंमलबजावणी केली जात असेल, तर पदाधिकारी किंवा त्यांच्या नातेवाईकांच्या वाहनांबाबतही तेच



निकष लागू झाले पाहिजेत, अशी भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. विशेषतः एखाद्या लोकप्रतिनिधीच्या पदाचा किंवा नावाचा लोगो त्यांच्या नातेवाईकांच्या खासगी वाहनावर वापरला जात असल्यास, त्यामागे अधिकृत परवानगी आहे की केवळ पदाचा प्रभाव दाखविण्याचा प्रयत्न, याची स्पष्टता होणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे मलकापूर शहरात चर्चेत आलेल्या या वाहनांवरील 'लोगो' प्रकरणाची संबंधित प्रशासन दखल घेणार का? संबंधित वाहनांची तपासणी करून लोगो वापरण्यामागे अधिकृत परवानगी आहे की नाही, हे स्पष्ट केले जाणार का? नियमांचा भंग आढळल्यास संबंधितांवर कारवाई होणार का, याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे. शहरात वाहनांवर पदनाम, लोगो अथवा विशेष ओळखचिन्ह लावण्याचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. काही वर्षांपूर्वी आमदार, विधानपरिषद सदस्य तसेच खासदार यांच्या वाहनांवर पदाशी संबंधित लोगो अथवा ओळखचिन्ह लावल्याची चर्चा होती. आता नगरसेवकांच्या नावाचा अथवा पदाचा लोगो त्यांच्या नातेवाईकांच्या वाहनांवर झळकत असल्याचे दिसून येत असल्याने शहरात नव्या चर्चेला उधाण आले आहे. वाहनांवर अशा प्रकारचे पदनाम, लोगो किंवा विशेष ओळखचिन्ह लावण्यास नेमकी कोणती परवानगी आहे, याबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. संबंधित वाहनधारकांना अशा प्रकारचा लोगो वापरण्याची अधिकृत परवानगी आहे का? असल्यास त्यासाठीचे नियम व निकष कोणते आहेत? आणि परवानगी नसल्यास संबंधित यंत्रणा याबाबत कोणती कारवाई करणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पद कोणतेही असो, नियम मात्र सर्वांसाठी समान हवेत लोकप्रतिनिधी असो अथवा सामान्य नागरिक, वाहनांवर नियमबाह्य चिन्हांचा वापर होत असल्यास संबंधित यंत्रणेने त्याची तपासणी करून नियमानुसार कारवाई करणे अपेक्षित आहे.

नाडगावात भक्तिमय वातावरणात श्री कालभैरवनाथ यात्रोत्सव!



जन सम्राट टाईम्स

बोदवड। प्रतिनिधी: मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघातील नाडगाव येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री कालभैरवनाथ महाराजांचा यात्रोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यात्रोत्सवानिमित्त मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंद्रकांतभाऊ पाटील यांनी श्री कालभैरवनाथ महाराजांचे मनोभावे दर्शन घेत विधिवत पूजन केले. यावेळी मंदिरात धार्मिक विधी पार पाडत नाडगाव परिसरातील नागरिक, शेतकरी बांधव आणि भाविकांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली. तसेच यात्रेच्या पारंपरिक परंपरेनुसार बैलपोळा पूजन करण्यात आले. शेतकरी बांधवांच्या जीवनात सुख, समाधान, समृद्धी आणि भरभराट नांदो, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली. यात्रोत्सवानिमित्त नाडगाव परिसरात दिवसभर उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले. मंदिराची आकर्षक सजावट, भाविकांची मोठी गर्दी तसेच विविध धार्मिक आणि पारंपरिक उपक्रमांमुळे संपूर्ण परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. याप्रसंगी शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, मित्रपरिवार तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री कालभैरवनाथ महाराजांच्या कृपेने नाडगावसह संपूर्ण मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघात सुख, शांती, समृद्धी आणि भरभराट नांदो, अशी मनःपूर्वक प्रार्थना करण्यात आली.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

साकत येथे कै. अयोध्या सुखदेव पुलवळे यांच्या प्रथम

पुण्यस्मरणानिमित्त 'अमृततुल्य कीर्तन' संपन्न

जन सम्राट टाईम्स



अहिल्यानगर | प्रतिनिधी: जामखेड - कै. अयोध्या सुखदेव पुलवळे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी साकत (ता. जामखेड) येथे भावपूर्ण वातावरणात पुण्यस्मरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त ह.भ.प. उत्तम महाराज वराट यांच्या अमृततुल्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या कीर्तनाला साकत ग्रामस्थ तसेच पंचक्रोशीतील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रथम पुण्यस्मरणानिमित्त सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. उत्तम महाराज वराट यांचे कीर्तन संपन्न झाले. आपल्या कीर्तनातून महाराजांनी कै. अयोध्या पुलवळे यांच्या साध्या, संस्कारशील आणि सेवाभावी जीवनप्रवासावर प्रकाश टाकला. कै. अयोध्या पुलवळे यांनी गवळणी आणि भजनाच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. संपूर्ण आयुष्यभर त्यांनी कुटुंबातील प्रत्येक सदस्यावर संस्कारांची अमूल्य शिदोरी दिली. त्यांचे साधेपण, सेवाभाव आणि माणुसकीची शिकवण पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार ह.भ.प. उत्तम महाराज वराट यांनी काढले.

मान्यवरांची उपस्थिती; भावपूर्ण श्रद्धांजली

कै. अयोध्या पुलवळे यांना संपूर्ण साकत पंचक्रोशीत विशेष मान-सन्मान प्राप्त होता. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणारी नसली, तरी त्यांनी दिलेले संस्कार, प्रेम आणि माणुसकीची शिकवण सदैव स्मरणात राहील, अशी भावना उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केली. यावेळी ग्रामस्थ, नातेवाईक आणि आप्तेष्टांनी एकत्र येत कै. अयोध्या पुलवळे यांच्या पवित्र आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी, यासाठी सामूहिक प्रार्थनाही करण्यात आली. या पुण्यस्मरण कार्यक्रमास जामखेड पंचायत समितीचे माजी सभापती डॉ. भगवान मुरुमकर, दिनकर मुरुमकर, रामभाऊ मुरुमकर यांच्यासह पुलवळे कुटुंबीय, नातेवाईक तसेच साकत पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी कै. अयोध्या पुलवळे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पवित्र स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. कै. अयोध्या सुखदेव पुलवळे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी साकत (ता. जामखेड) येथे भावपूर्ण वातावरणात पुण्यस्मरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त ह.भ.प. उत्तम महाराज वराट यांच्या अमृततुल्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या कीर्तनाला साकत ग्रामस्थ तसेच पंचक्रोशीतील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रथम पुण्यस्मरणानिमित्त सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. उत्तम महाराज वराट यांचे कीर्तन संपन्न झाले. आपल्या कीर्तनातून महाराजांनी कै. अयोध्या पुलवळे यांच्या साध्या, संस्कारशील आणि सेवाभावी जीवनप्रवासावर प्रकाश टाकला.

'कम्युनिटी ॲक्शन अवॉर्ड' साठी प्रशांत बावस्कार यांची निवड

महिला आरोग्य क्षेत्रातील कार्याची जागतिक दखल

जन सम्राट टाईम्स



भुसावळ। प्रतिनिधी: मलकापूर तालुक्यातील बेलाड येथील तरुण सामाजिक कार्यकर्ते प्रशांत निताबाई पांडुरंग बावस्कार यांच्या सामाजिक कार्याची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली असून, अमेरिकेतील नामांकित ॲस्पायर इन्स्टिट्यूटतर्फे त्यांची प्रतिष्ठित *"कम्युनिटी ॲक्शन अवॉर्ड"*साठी निवड झाली आहे. ग्रामीण भागातील मासिक पाळी स्वच्छता, महिला आरोग्य आणि सामाजिक जनजागृती क्षेत्रात त्यांनी राबविलेल्या प्रभावी उपक्रमांचा या पुरस्काराद्वारे गौरव करण्यात येणार आहे. या आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी जगभरातील ३० पेक्षा अधिक देशांतून तब्बल ८६५ प्रकल्प प्रस्ताव सादर करण्यात आले होते. विविध मूल्यांकन फेऱ्या, तज्ज्ञांचे परीक्षण तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील सादरीकरणानंतर प्रशांत बावस्कार यांच्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाची अंतिम निवड करण्यात आली. ग्रामीण भागात प्रत्यक्ष समुदायासोबत काम करत संवेदनशील विषयांवर शाश्वत बदल घडवून आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना मिळालेली ही जागतिक पावती मानली जात आहे. या पुरस्कारामुळे ग्रामीण भागातील सामाजिक उपक्रमांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळण्यास मदत होईल, असा विश्वास बावस्कार यांनी व्यक्त केला. ॲस्पायर इन्स्टिट्यूट ही अमेरिकास्थित जागतिक संस्था असून, वंचित आणि विविध सामाजिक पार्श्वभूमीतून येणाऱ्या गुणवंत तरुणांना नेतृत्व विकास, मार्गदर्शन आणि आंतरराष्ट्रीय संधी उपलब्ध करून देण्याचे काम करते. प्रशांत बावस्कार हे संस्थेच्या 'ॲस्पायर लीडर्स प्रोग्राम'चे माजी विद्यार्थी आहेत. विविध सामाजिक विकासाचे कार्य प्रशांत बावस्कार यांनी देशातील विविध राज्यांमध्ये सामाजिक विकासाच्या क्षेत्रात काम केले आहे. महिला आरोग्य आणि मासिक पाळी व्यवस्थापनासोबतच नीती आयोगाच्या आकांक्षी जिल्हा कार्यक्रमांतर्गत झारखंडमध्ये त्यांनी योगदान दिले आहे. तसेच केंद्र सरकारच्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान (FLN) अभियानांतर्गत गुजरात आणि पंजाबमध्ये शिक्षण विकासासाठीही त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. राष्ट्रीय पुरस्कारानंतर आता जागतिक सन्मान ग्रामीण भागात मासिक पाळी आणि महिला आरोग्याविषयी सातत्यपूर्ण जनजागृती व प्रत्यक्ष कार्य केल्याबद्दल प्रशांत बावस्कार यांना नुकतेच नवी दिल्ली येथील 'वी द पीपल अभियान' या संस्थेचा 'संविधान साथी' राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. राष्ट्रीय सन्मानानंतर आता मिळालेल्या जागतिक पुरस्कारामुळे त्यांच्या सामाजिक कार्याला आणखी व्यापक ओळख मिळाली आहे. प्रशांत बावस्कार हे ग्रामीण विकास अध्ययन केंद्र व समाजकार्य संशोधन संस्था, अहिल्यानगरचे माजी विद्यार्थी असून त्यांनी पिरामल फाऊंडेशनची गांधी फेलोशिपदेखील पूर्ण केली आहे.

नाहाटा महाविद्यालयात ललित कला स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

मेहंदीपासून एआयपर्यंत विविध विषयांवर विद्यार्थ्यांची कलात्मक मांडणी

जन सम्राट टाईम्स



भुसावळ । प्रतिनिधी: भुसावळ येथील कला, विज्ञान व पी. ओ. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयात ९ सप्टेंबर २०२६ रोजी ललित कला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या या स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध कलाप्रकारांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सामाजिक, पर्यावरणीय आणि समकालीन विषयांचे प्रभावी सादरीकरण केले. स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एच. बऱ्हाटे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपप्राचार्य डॉ. दीपक पाटील, डॉ. जी. आर. वाणी, कार्यालय प्रबंधक श्री. भगवान तायडे तसेच कला मंडळ प्रमुख डॉ. प्रफुल्ल इंगोले उपस्थित होते.

ललित कला स्पर्धांमध्ये रांगोळी, मेहंदी, व्यंगचित्र, कोलाज, इन्स्टॉलेशन, फोटोग्राफी, स्पॉट पेंटिंग, पोस्टर मेकिंग आणि क्ले मॉडेलिंग अशा विविध स्पर्धांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृतींतून सामाजिक प्रश्न, बदलते तंत्रज्ञान आणि समकालीन जीवनशैली यांचे विविध पैलू मांडले. सामाजिक विषयांपासून 'AI आणि मानवी जीवन'पर्यंत स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना महिला सबलीकरण, स्वच्छ भारत अभियान, डिजिटल इंडिया, जेन झी, भारतीय संस्कृती व सण-उत्सव, सोशल मीडियाचे फायदे व तोटे, वन्यजीव संरक्षण, माझ्या स्वप्नातील भारत, पर्यावरणीय बदल, मोबाईलच्या आहारी गेलेली तरुणाई, महागाई, भ्रष्टाचार, राजकारण तसेच 'AI आणि मानवी जीवन' आदी विषय देण्यात आले होते. या विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी कल्पकता, सर्जनशीलता आणि सामाजिक भान यांचा सुंदर मिलाफ साधत कलाकृती साकारल्या. स्पर्धेत एकूण ९९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. वंदना महाजन, डॉ. विद्या पाटील, प्रा. नयना चौधरी, डॉ. दिनानाथ पाठक, डॉ. सचिन राजपूत, प्रा. प्रणिता राणे, प्रा. सपना जंगले, डॉ. एस. के. राठोड, प्रा. नेहा महाजन, प्रा. गौतम भालेराव, डॉ. कविता पांडव, डॉ. प्रियंका महाजन, डॉ. जितेंद्र आडोकार, प्रा. ज्ञानेश्वर जावळे, प्रा. सुनील अडकमोल आणि डॉ. शलाका निकम आदींनी सहकार्य केले. स्पर्धांचे परीक्षण डॉ. रश्मी शर्मा, डॉ. गौरी पाटील, डॉ. स्मिता चौधरी, डॉ. ममता पाटील, डॉ. उमेश फेगडे, डॉ. विलास महिरे, डॉ. हर्षल पाटील, डॉ. एस. टी. धूम, डॉ. मनोज पाटील, डॉ. किरण वारके, डॉ. सचिन येवले, डॉ. दीपक पाटील आणि डॉ. मनोज जाधव आदींनी केले.

प्रवीण पाटील यांची चोपडा पंचायत समितीत डेटा एन्ट्री ऑपरेटरपदी निवड

जन सम्राट टाईम्स



चोपडा / बाभळे, । प्रतिनिधी: बाभळे गावचे सुपुत्र श्री. पाटील प्रवीण संजय यांची चोपडा पंचायत समिती येथे डेटा एन्ट्री ऑपरेटर या पदावर निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल बाभळे गावासह चोपडा तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्रवीण पाटील हे सर्वसामान्य कुटुंबातून आले असून, त्यांनी जिद्द, मेहनत आणि सातत्याच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळविलेल्या या यशामुळे त्यांच्या कुटुंबीयांसह मित्रपरिवार आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. प्रवीण पाटील यांच्या निवडीमुळे बाभळे गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या यशातून गावातील तरुणांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे. ग्रामीण भागातील युवकांनी मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर स्पर्धात्मक क्षेत्रात यश संपादन करावे, यासाठी त्यांची वाटचाल प्रेरणादायी ठरणार आहे. या निवडीबद्दल शुभेच्छुक श्री. विजयकुमार पाटील, शिक्षक – बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्रवीण पाटील यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. पंचायत समितीतील आपल्या जबाबदारीच्या पदावर ते उत्कृष्ट कामगिरी करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. प्रवीण पाटील यांच्या यशाबद्दल बाभळे गावातील ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच चोपडा तालुक्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

धरणगावात एड्ससह मानसिक व लैंगिक आरोग्याबाबत मार्गदर्शन!

इंटेंसिफाइड कॅम्पेन 3.0 अंतर्गत जनजागृती



जन सम्राट टाईम्स

धरणगाव| प्रतिनिधी : राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार इंटेंसिफाइड कॅम्पेन 3.0 अंतर्गत सारजाई दामोदर कुडे माध्यमिक विद्यालय, धरणगाव येथे किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्य, आरोग्य व एचआयव्ही-एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आय.सी.टी.सी. (ICTC) ग्रामीण रुग्णालय, धरणगाव आणि साने गुरुजी फाउंडेशन, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना किशोरावस्था, शारीरिक व मानसिक बदल, प्रजननक्षम व लैंगिक आरोग्य, मानसिक आरोग्याच्या समस्या, मादक पदार्थांचा दुरुपयोग तसेच एचआयव्ही/एड्स याबाबत शास्त्रीय आणि सविस्तर माहिती देण्यात आली. एचआयव्हीचा संसर्ग होण्याचे मार्ग, प्रतिबंधात्मक उपाय तसेच शासनाच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या मोफत उपचार व आरोग्यसेवांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळी एचआयव्ही आणि एड्स (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, एचआयव्ही बाधित व्यक्तींना मिळणारे कायदेशीर संरक्षण, त्यांचे मूलभूत हक्क आणि गोपनीयतेचा अधिकार याबाबतही विशेष मार्गदर्शन करण्यात आले. किशोरवयीन विद्यार्थ्यांनी आरोग्यविषयक प्रश्नांबाबत योग्य माहिती जाणून घेणे आणि गैरसमज दूर करणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमास माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. डी. आर. चव्हाण सर, श्री. अहिरराव सर, श्री. सूर्यवंशी सर, श्री. रोकडे सर, ICTC विभागाचे समुपदेशक श्री. ज्ञानेश्वर शिंपी, आरकेएसके समुपदेशक श्री. गणेश कुंभार, साने गुरुजी फाउंडेशन, अमळनेरच्या लिंक वर्कर श्रीमती अश्विनी शिंपी, इतर शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळा, आरोग्य विभाग आणि सामाजिक संस्थांच्या समन्वयातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना किशोरावस्था, आरोग्य, व्यसनमुक्ती एड्सबाबत योग्य व शास्त्रीय माहिती मिळाली. सर्वांच्या सहकार्याने हा जनजागृतीपर कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

बुऱ्हाणपूर सोलापूर महामार्गावरील अतिक्रमणांवर कारवाईचा धडाका

बुऱ्हाणपूर सोलापूर महामार्गा, शहरातील रस्ते, फुटपाथ आणि चौक मोकळे कधी

जन सम्राट टाईम्स



मलकापूर । प्रतिनिधी: बुऱ्हाणपूर सोलापूर महामार्गावरील अतिक्रमणांवर प्रशासनाचा हातोडा पडत असताना आता नगरपरिषद प्रशासनाच्या कारवाईकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. महामार्गावरील अतिक्रमणे हटविण्यासाठी प्रशासन आक्रमक झाले असेल, तर नगरपरिषद हद्दीतील रस्ते, फुटपाथ, चौक आणि सार्वजनिक जागांवर वर्षानुवर्षे ठाण मांडून बसलेल्या अतिक्रमणांवर कारवाई कधी होणार? असा थेट सवाल शहरवासीयांकडून उपस्थित केला जात आहे. शहरातील अनेक प्रमुख मार्गांवर अतिक्रमणांमुळे वाहतुकीची कोंडी, पादचाऱ्यांची गैरसोय आणि सार्वजनिक जागेचा बेकायदेशीर वापर ही नित्याचीच बाब बनली आहे. काही ठिकाणी रस्त्याच्या कडेला तसेच फुटपाथवर अतिक्रमणे वाढत असतानाही संबंधित प्रशासनाची भूमिका नेमकी काय, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

महामार्गावरील अतिक्रमणांवर कारवाई आणि नगरपरिषद हद्दीत मात्र मौन, अशी परिस्थिती निर्माण झाली तर 'आपला तो बाबू, दुसऱ्याचं ते कार्ट' अशी चर्चा होणे स्वाभाविक आहे. काही निवडक अतिक्रमणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत असून, या आरोपांबाबत नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडण्याची गरज निर्माण झाली आहे.

महामार्गासाठी एक नियम, शहरासाठी दुसरा?

अतिक्रमण हा अतिक्रमणच असतो. तो महामार्गावर असो अथवा नगरपरिषद हद्दीतील रस्त्यावर. मग कारवाईचे निकष वेगवेगळे का? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. सार्वजनिक रस्ते आणि फुटपाथ नागरिकांच्या वापरासाठी आहेत की अतिक्रमणधारकांसाठी, याचे उत्तर प्रशासनाने देणे अपेक्षित आहे. 'कारवाई करायची तर सरसकट करा!' अतिक्रमण हटाव मोहीम राबविताना कोणताही राजकीय, सामाजिक अथवा इतर दबाव न आणता सर्व अतिक्रमणांवर समान निकषाने कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. नगरपरिषद प्रशासनाने शहरातील अतिक्रमणांची व्यापक पाहणी करून रस्ते, फुटपाथ आणि सार्वजनिक जागा तातडीने मोकळ्या कराव्यात, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. महामार्गावरील कारवाईनंतर आता नगरपरिषद प्रशासन शहरातील अतिक्रमणांवरही हातोडा चालवणार का? की अतिक्रमण हटाव मोहीम महामार्गापुरतीच मर्यादित राहणार? या प्रश्नाचे उत्तर आता मलकापूरकरांना नगरपरिषद प्रशासनाकडून हवे आहे. अतिक्रमणांवर प्रशासनाचा हातोडा पडत असताना आता नगरपरिषद प्रशासनाच्या कारवाईकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. महामार्गावरील अतिक्रमणे हटविण्यासाठी प्रशासन आक्रमक झाले असेल, तर नगरपरिषद हद्दीतील रस्ते, फुटपाथ, चौक आणि सार्वजनिक जागांवर वर्षानुवर्षे ठाण मांडून बसलेल्या अतिक्रमणांवर कारवाई कधी होणार? असा थेट सवाल शहरवासीयांकडून उपस्थित केला जात आहे. शहरातील अनेक प्रमुख मार्गांवर अतिक्रमणांमुळे वाहतुकीची कोंडी, पादचाऱ्यांची गैरसोय आणि सार्वजनिक जागेचा बेकायदेशीर वापर ही नित्याचीच बाब बनली आहे.